# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील 'ब' सत्ताप्रकारच्या मिळकती नियमित करण्याबाबत

**(१) २२९ (२७-०४-२०२५). :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील 'ब' सत्ताप्रकार मिळकत नियमित करण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक येथे नगर भुमापन काम १९७० मध्ये झालेले आहे. त्याप्रमाणे १७८ मिळकतींना "ब" सत्ता प्रकार नमुद केलेला आहे. सदरचे "ब" सत्ता प्रकारच्या १७८ मिळकती ह्या वाढीव गावठाण मधील आहेत. त्यापैकी ४२ अर्जदार यांनी सत्ताप्रकार बदलाबाबत अर्ज सादर केलेले असुन सदरचे अर्ज उप अधीक्षक भूमि अभिलेख निफाड यांचेकडे चौकशी अहवाल व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावांपैकी ६ प्रस्ताव जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांचेकडून प्राप्त झाले आहेत. त्यासंदर्भात नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरीत ३६ प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, नाशिक अधिनस्त उप अधिक्षक भूमि अभिलेख, निफाड यांचे स्तरावरुन अर्जदारांना कळविण्यात आले असता, मागणी केलेली कागदपत्रे संबंधीतांनी अद्यापपावेतो सादर केलेली नाही.

सदर विषयासंदर्भात मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार उपविभागीय अधिकारी निफाड, तहसिलदार निफाड व उप अधीक्षक भूमि अभिलेख निफाड यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून दिनांक २४/०४/२०२५, दिनांक ०५/०५/२०२५ व दिनांक २३/०५/२०२५ रोजीच्या बैठकांना हजर राहून कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत अध्यक्ष, "ब" सत्ता प्रकार संघर्ष समिती यांना कळविले असता, ते सदर वेळी हजर राहीले नसल्याने पुढील कार्यवाही प्रलंबित आहे.

## पुणे, कोंढवे ,धावडे व उत्तमनगर (जि.पुणे) येथील नागरिकांच्या नावाचा ७/१२ उताऱ्यावर समावेश करण्याबाबत

**(२) ९३२ (२९-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, कोंढवे,धावडे व उत्तमनगर (जि.पुणे) येथील नागरिकांचे ७/१२ उताऱ्यावर नावाचा समावेश करण्यास अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अडचणीमुळे खडकवासला मतदारसंघातील अनेक प्रकल्प अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७/१२ उताऱ्यावर नाव लावण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबिण्यात येत आहे, तसेच याबाबत नागरिकांच्या न्याय हक्कासाठी त्यांची नावे ७/१२ उताऱ्यावर लागणे आवश्यक असताना संबंधित विभाग दुर्लक्ष करीत

आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१) मौजे कोंढवे, धावडे व उत्तमनगर येथे अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) अशी बाब नाही.
(३) सन २०२१ पासुन सर्व दस्तांचे फेरफार हे दुय्यम निबंधक यांचेकडून ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होत असलेने व त्यापुढील सर्व प्रक्रीया शासनाने घालुन दिलेल्या मानकांनुसार ऑनलाईन पध्दतीने राबविणेत येत असलेने तसेच ऑनलाईन फेरफारबाबत FIFO प्रणाली लागु असुन त्यानुसार प्रथम प्राप्त होणा-या फेरफारावर प्रथम निर्णय घेतला जातो. त्यामुळे नागरीकांच्या न्याय हक्कासाठी त्यांची नावे ७/१२ उता-यावर लावणे आवश्यक असताना संबधित विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे बदलापूर (ता.अंबरनाथ, जि. ठाणे) येथील जमिन**
**नियमबाह्य रित्या हस्तांतरीत केल्याबाबत**

**(३) ९५२ (२६-०४-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बदलापूर (ता.अंबरनाथ, जि. ठाणे) येथील श्री. अनंता रघुनाथ लोहार यांनी येथील स.नं.१८२/१ स.नं.१८९/५ तसेच स.नं.१८०,१८१,१८२/२ स.नं. १७९,१८०,१८२ व इतर जमीन तहसीलदार, अंबरनाथ व प्रांताधिकारी, उल्हासनगर यांनी संगनमताने मुस्लीम समाजातील नागरिकांच्या नावाने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची माहिती व तपशील तहसीलदार व प्रांताधिकारी, उल्हासनगर व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाने वेळोवेळी मागवूनही मिळत नसल्याचे सन २०२४ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार श्री.अनंता रघुनाथ लोहार यांची जमीन बळकावणाऱ्या तत्कालीन तहसीलदार व प्रांताधिकारी तसेच संगनमत करणाऱ्या मुस्लीम समाजातील लोकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मौजे बदलापुर ता.अंबरनाथ जि. ठाणे येथील स.नं.१८२/१, स.नं.१८९/५ तसेच स.नं.१८०, १८१, १८२/२ स.नं. १७९, १८०, १८२ येथील जमिनीबाबतच्या फेरफार संचिकेमध्ये/ दस्तऐवजामध्ये श्री. अनंता रघुनाथ लोहार यांच्या मालकीबाबतच्या हस्तांतरणाचा अभिलेख दिसून येत नाही. यास्तव सदर जमिनीच्या अनुषंगाने कोणतेही नियमबाह्य हस्तांतण झालेले नसल्याकारणाने कोणत्याही सरकारी अधिकारी तसेच इतर लोकांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे सारमाळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.४८/०८**
**जमिनीच्या बिनशेती आदेशाबाबत**

**(४) ९७५ (२६-०४-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सारमाळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील क्र. ४८/०८ दिनांक १८/०९/२००८ चे बिनशेती आदेश उपवनसंरक्षक, शहापूर यांचे अभिप्राय अथवा ना-हरकत दाखला न घेता तसेच नगर रचनाकार, ठाणे यांच्याकडून नकाशे मंजूर न करता केवळ मंजूर टिप्पणीद्वारे बिनशेती आदेश पारित केल्याने अध्यक्ष, कुणबी महोत्सव प्रतिष्ठान कोकण विभाग यांनी दिनांक १२ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास या आदेशाची चौकशी करून बिनशेती आदेश रद्द करण्याबाबतची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन बिनशेती आदेश रद्द करुन संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता न करता बिनशेती आदेश पारित करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-११-२०२५) :** (१), (२) व (३) मौजे सारमाळ, ता.शहापूर, जि.ठाणे स.नं. १८ ते ५८ (एकूण ४२), क्षेत्र २,८४,३०० चौ.मी. बाबत अर्जदार श्री.गोविंद पांडू शेलार व इतर खातेदार यांचे कुळमुखत्यारधारक श्री.दिलीप कुमार जैमन यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी,ठाणे यांनी दिनांक १८.०९.२००८ रोजी बिनशेती व बांधकाम परवानगी देण्याबाबतचे आदेश निर्गमित केले होते. सदरचे आदेश निर्गमित करताना वन विभागाचे व भूसंपादन विषयीचे अभिप्राय घेतले नसल्याचे दिसून येत आहे. तथापि, विषयांकित जमिनीच्या अधिकार अभिलेखात वन विभागाबाबतच्या नोंदी दिसून येत नाहीत.

सदर बिनशेती आदेशाबाबत श्री. रविंद्र चंद्रकांत चंदे, अध्यक्ष, कुणबी महोत्सव प्रतिष्ठान कोकण विभाग यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे दिनांक १३.०१.२०२० रोजी तक्रार केली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने चौकशी केली असता बिनशेती परवानगी आदेशातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्याने सदरहू आदेशाचे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ अन्वये पुनर्विलोकन करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना अहवाल सादर करण्यात आला होता. त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ०१.१२.२०२० रोजीचे पत्रान्वये बिनशेती व बांधकाम परवानगी आदेश पुनर्विलोकनात घेऊन नियमोचित कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते.

सदरहू निर्देशानुसार जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयात दिनांक २६.०२.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली व त्यानुषंगाने दिनांक २०.१२.२०२१ रोजी मौजे सारमाळ, ता.शहापूर, जि.ठाणे येथील विषयांकित जमिनीबाबत तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी दिलेले अकृषिक व बांधकाम परवानगी आदेश कायम ठेवून अर्जदार यांनी स्वतंत्रपणे सुधारित बांधकाम परवानगीसाठी दाखल केलेल्या विनंती अर्जाबाबत आवश्यक बाबींची पूर्तता करून घेऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार सहायक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील दिनांक १०.०५.२०२२ रोजीचे शिफारशीनुसार तसेच उप वनसंरक्षक, शहापूर वन विभाग, शहापूर यांच्या दिनांक ३०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडून दिनांक १७.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये मौजे सारमाळ, ता. शहापूर येथील गट नं. २० व इतर, क्षेत्र २,७२,९५० चौ.मी. बाबत दिनांक १७.०५.२०२२ रोजी औद्योगिक गोडावून प्रयोजनासाठी सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

---

## अकोट ( जि. अकोला) येथील भूमी अभिलेख कार्यालयात गैरव्यवहार झाल्याबाबत.

**(५) ९९८ (२८-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) येथील उपअधिक्षक, भूमी अभिलेख या कार्यालयात विविध प्रकरणांमध्ये मोठया प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होत असल्याची तक्रार श्री. दिपक गावंडे राहणार तांदुलवाडी यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान संचालक भूमी अभिलेख पुणे यांना लेखी निवेदन देऊन केली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, उक्त आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०७-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

श्री.दिपक गावंडे, रा.तांदुळवाडी यांचा उप अधीक्षक भूमि अभिलेख, अकोट या कार्यालयात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याबाबतचा दिनांक ०४/११/२०२४ रोजीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) होय,

श्री.गावंडे यांची तक्रार मौजे बळेगाव तालुका अकोट जिल्हा अकोला येथील गट नं.२४८ च्या मोजणी कामी श्रीमती.विजया संदिप अग्रवाल यांनी पोटहिस्सा मोजणीसाठी दाखल केलेल्या अर्जासंबंधित आहे. सदर मोजणी अर्ज ई-मोजणी व्हर्जन २.० या अज्ञावलीमध्ये मोजणी कामी श्री.रूपेश दिनकरराव राऊत, भूकरमपाक यांचे नावाने नोंद होता. सदर मोजणी प्रकरणात नियोजनात बदलाचे कोणतेही आदेश नसताना श्री.श्रेयस विनोदराव गुल्हाने यांनी स्वअधिकारात परस्पर पोट-हिस्सा मोजणीची कार्यवाही करुन अनियमितता केली आहे.

याबाबत दोषी कर्मचारी श्री.श्रेयस विनोदराव गुल्हाने यांना दिनांक २१/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच अन्य कर्मचारी- प्रभारी छाननी लिपीक, मुख्यालय सहायक, शिरस्तेदार यांनी मुळ प्रकरणाची कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता तसेच भूकरमापक यांनी सदर प्रकरण त्यांचे नावांने असतांनाही मोजणी न करता त्यांच्या लॉगीनमधून प्रकरणाची माहिती अद्ययावत केलेली आहे. सदर अनियमिततेच्या अनुषंगाने सर्व कर्मचाऱ्यांच्या विरुध्द दिनांक २०.२.२०२५ च्या आदेशान्वये त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिराळा, वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील डोंगरी भागातील नागरिकांना एक गुंठा क्षेत्राची खरेदी विक्री करण्याची परवानगी मिळण्याबाबत

**(६) १००१ (२८-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिरायत व बागायती शेतीच्या खरेदी-विक्री संदर्भात दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार तुकडेबंदी कायद्यात जमिनीची खरेदी विक्री करण्याची मंजूरी शासनाकडून देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयाद्वारे तुकडेबंदी कायद्यात विहिरीकरिता (५ गुंठे), शेत रस्त्यासाठी, सार्वजनिक प्रयोजनासाठी व राज्य-केंद्र ग्रामीण घरकुल प्रयोजनासाठीची खरेदी-विक्रीची (१ गुंठा) एवढया क्षेत्राची खरेदी-विक्री करण्याची मंजूरी शासनाकडून देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिराळा, वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील काही गावांचा डोंगरी विभागात समावेश आहे परंतु तेथील नागरीकांकडे असलेले जमिनीचे धारण क्षेत्र हे अत्यंत कमी म्हणजे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असल्याने खरेदी देणाऱ्यास आर्थिक गरजेपोटी १ गुंठा खरेदी-विक्रीचे आणि घर बांधणीसाठी १ गुंठा क्षेत्राची आवश्यकता असल्याने उक्त व्यवहार करताना वरील शासन निर्णयाचा स्थानिकांना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अडचणीतून मार्ग काढण्याकरीता विशेष बाब म्हणून १ गुंठा जमिनीची खरेदी-विक्री करण्यास प्राधान्याने परवानगी मिळावी अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू मागणीच्या अनुषंगाने शिराळा येथील डोंगरी विभागातील सर्व गावांतील नागरिकांना घरबांधणीसाठी १ गुंठा क्षेत्राची खरेदी-विक्री करण्याकरिता विशेष बाब म्हणून परवानगी मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०७-२०२५) :** (१) व (२) शासन अधिसूचना दिनांक १४/०३/२०२४ अन्वये सिंचनासाठी विहीर, शेतीसाठी रस्ता, सार्वजनिक प्रयोजनासाठी झालेल्या भुसंपादन परिणामी झालेला तुकडा किंवा थेट खरेदी केल्यानंतर शिल्लक राहीलेली लगतची शेतजमीन, केंद्र व राज्य ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना १००० चौ. फुट जागा, इ. प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण जिल्हाधिकारी यांच्या पुर्वपरवानगीने करता येईल, अशी सुधारणा महाराष्ट्र धारण जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत नियम, १९५९ मध्ये करण्यात आली आहे हे खरे आहे.
(३), (४) व (५) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ हा शेती क्षेत्रासाठी लागू असून सदर अधिनियमामधील तरतुदीनुसार प्रत्येक स्थानिक क्षेत्रासाठी किफायतशिर शेती करण्यासाठी आवश्यक आहे असे शेती प्रयोजनार्थ किमान क्षेत्र घोषित करण्यात येते. स्थानिक क्षेत्रामध्ये प्रमाणभूत क्षेत्राबाबत सल्ला देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समित्यांनी केलेल्या शिफारशीस अनुसरुन मुंबई शहर, मुंबई उपनगर, अकोला व रायगड वगळता उर्वरित ३२ जिल्हयांकरीता जिरायत क्षेत्रासाठी २० गुंठे व बागायत क्षेत्रासाठी १० गुंठे असे प्रमाणभूत क्षेत्राबाबतची अंतिम अधिसूचना दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

**घुग्गुस (जि. चंद्रपूर) येथील लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी लि. च्या प्रस्तावित विस्तारीकरणाबाबत**

**(७) १२१५ (२६-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घुग्गुस (जि. चंद्रपूर) येथील लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी लिमी.च्या प्रस्तावित विस्तारीकरणासंदर्भात पर्यावरण विषयक अहवाल सादर करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला माहे डिसेंबर, २०२४ मध्ये दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावित विस्तारीकरणाच्या संदर्भात पर्यावरण विषयक जनसुनावणी झाली असून पर्यावरणवादयांनी विरोध करत विस्तारीकरण झाल्यास स्थानिकांना अनेक गोष्टींचा त्रास सहन करावा लागेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावित विस्तारीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०८-२०२५) :** (१), (२), (३) व (४) • घुग्घूस (जि. चंद्रपूर) येथील लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी लिमी. प्रकल्प हा पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार ए-१(अ) संवर्गात मोडत असल्याने सदर प्रकल्पाची पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फ़त देण्यात येते.
• त्यानुषंगाने केंद्र शासनाने सदर प्रकल्पाच्या टीओआरला (TOR) ला दिनांक १८ जुलै, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.
• पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प प्रवर्तकाने प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील

लोकांची पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहीर जनसुनावणी आयोजित करणे क्रमप्राप्त आहे.
• त्यानुसार सदर अधिसूचनेतील तरतूदीनुसार उपरोक्त नमूद प्रकल्पाच्या विस्तारीकरणाच्या अनुषंगाने जनसुनावणी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पार पडली आहे.
• त्यानुषंगाने जनसुनावणीचे इतिवृत्त महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात आले आहे.

---

**मौजे खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील खाजगी मालकीच्या जमिनीवर भूमाफियांनी चाळीचे बांधकाम केल्याबाबत**

**(८) १३३५ (२६-०४-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर १३/२ श्री.सुधीर गुप्ते यांच्या खाजगी मालकीच्या जागेत एका त्रयस्त भूमाफियाने विनापरवाना चाळीचे बांधकाम केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने खाजगी जागेत विनापरवाना चाळीचे बांधकाम करुन विक्री करणाऱ्या भूमाफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-११-२०२५) :** (१), (२) व (३) मौजे-खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं.१३/२ एकूण क्षेत्र ०-९०-१० हे.आर च्या गाव नमुना नंबर ७/१२ च्या भोगवटादार सदरी "ज्योती विश्वजीत सरकार, वैजंती प्रदिप मंत्री, शामल चंद्रशेखर ताम्हाणे व सुधिर शांताराम गुप्ते यांची नांवे दाखल आहेत. सदर जमीन भोगवटादार यांचे नावे फेरफार क्रमांक १६८१ दिनांक ०६/०२/२०१८ अन्वये वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे.

सदर जागेची स्थळपाहणी केली असता सदर जमीनीवर त्रयस्थ इसम १) श्री. निखिल पितांबरे २) श्री. ज्ञानसिंग गुलाब यादव ३) श्री. सोमनाथ शुक्ला व ४) श्री. दिनानाथ रामलखन प्रजापती सर्व रा. खडवली ता. कल्याण यांनी चाळीचे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. तसेच त्रयस्थ भूमाफिया यांनी सदर चाळींमधील काही खोल्या अनोंदणीकृत विक्री कराराने व भाड्याने नागरीकांना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने तहसीलदार कल्याण यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अन्वये दिनांक ०५/०५/२०२५ रोजी संबंधितांना अतिक्रमण निष्कासनाबाबत नोटीस देण्यात आली आहे. तसेच दिनांक १३/०६/२०२५ रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, कल्याण तालुका पोलीस स्टेशन (ग्रामीण) येथे FIR No.०३२८ दिनांक २०/०६/२०२५ अन्वये श्री. निखिल पितांबरे व इतर यांचेविरुध्द गुन्हा नोंद दाखल करण्यात आला आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादकांना पिक विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(९) १३९३ (२५-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे सन २०२३-२४ या कालावधीमध्ये मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी पिक विमा कंपनी दिरंगाई करीत असून, भरपाईचे पैसे दिले नाहीतर कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले

आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन पिक विमा कंपनीवर कारवाई करुन द्राक्ष उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भरत गोगावले (०५-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय,
(३) आंबिया बहार सन २०२३-२४ मध्ये सांगली जिल्हयात द्राक्ष फळपीकासाठी एकूण १८९६ शेतकरी सहभागी झाले होते. या सर्वच शेतकऱ्यांना एकूण रु.१८,२३,७१,३११/- इतकी नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे अकोला येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालयाच्या नविन प्रशासकिय इमारतीकरिता जागा मंजूर करण्याबाबत.

**(१०) १५२२ (२३-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अकोला येथील नझुल शीट नं ३७ डी, यातील प्लॉट नं १, ३/३, ३/२, ४/२ एकूण क्षेत्र १४,२२०.८० चौ.मी ही जागा उपविभागीय अधिकारी, कार्यालय व तहसिल कार्यालयाच्या नविन प्रशासकिय इमारतीकरिता मंजूर करण्याबाबत तहसिलदार, अकोला यांनी दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी (महसूल) अकोला यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, कार्यालय व तहसिल कार्यालयाच्या नविन प्रशासकिय इमारतीकरिता मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.
जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे दिनांक १३.०१.२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीकरिता जागा मंजूरीबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नाही.सद्यस्थितीत उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय ही दोन्ही कार्यालये नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये कार्यरत आहेत.
मात्र, तहसीलदार,अकोला यांनी त्यांच्या दिनांक ०१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नझुल शीट नं.३७ डी, यातील प्लॉट नं.१,३/३,३/२, ४/२ एकूण क्षेत्र १४,२२०.८० चौ.मी जागेमध्ये अकोला तालुक्यामध्ये नव्याने अपर तहसील कार्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांना सादर केला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुंबई- चर्नी रोड येथील तारापोरवाला मत्स्यालय मागील चार वर्षापासून बंद असल्याबाबत

**(११) १७२२ (२६-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई- चर्नी रोड येथील तारापोरवाला मत्स्यालय मागील चार वर्षापासून बंद असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांची

मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त मत्स्यालय बंद असल्याने शासनाचा महसूल बुडत असून पर्यटकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे (१७-०७-२०२५) :** (१) होय.

देशभरात उद्भवलेल्या कोविड-१९ मुळे दिनांक २० मार्च, २०२० पासून तारापोरवाला मत्स्यालय पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आले आहे. याच दरम्यान तारापोरवाला मत्स्यालय व परिसरातील इतर २ इमारतींचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, फोर्ट, मुंबई यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अहवालानुसार मत्स्यालय व परिसरातील इतर २ इमारती धोकादायक स्थितीत असल्याचे कळविले आहे. त्यामुळे तारापोरवाला मत्स्यालय बंद ठेवण्यात आले आहे.
(२) मत्स्यालय व परिसरातील इतर २ इमारती धोकादायक स्थितीत असल्याने, त्याठिकाणी नवीन मत्स्यालय व कार्यालय बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी उपलब्ध असलेल्या तारापोरवाला मत्स्यालयाच्या जागेत जास्तीत जास्त एफएसआय (FSI) चा वापर करून नवीन अत्याधुनिक मत्स्यालय तसेच मत्स्यव्यवसाय विभागाचे कार्यालय बांधण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन समिती (PMC) नेमण्यासाठी योग्य त्या सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेस प्रतिसाद म्हणून तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु निविदाधारकांकडून तांत्रिक निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता न झाल्याने निविदाधारकांना अपात्र ठरवून सदरची ई-निविदा रद्द करण्यात आली आहे. पुन:श्च ई-निविदा प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केज व अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील कार्यरत तलाठी यांच्या कार्यालयीन कामकाजाची चौकशी करण्याबाबत

**(१२) २०४६ (२६-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) तालुक्यातील कार्यरत तलाठी श्री. साहिल इनामदार यांनी वाटणी पत्रांच्या नोंदी मोठ्या प्रमाणात बॉडवर घेऊन ५० ते ५५ वर्षापूर्वीचे फेर वरिष्ठांची परवानगी न घेता आर्थिक व्यवहारातून ऑनलाईन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यातील कार्यरत तलाठी श्री. नाना लाड यांनी वाटणी पत्राच्या एकूण १५४ नोंदी बॉंड वर घेतल्या असून उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी तलाठी श्री. लाड यांची विभागीय चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत उक्त दोन्ही तलाठयांनी केलेल्या गैरव्यवहारासंदर्भात चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव महसूल विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त तलाठी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-१०-२०२५) :** (१) संबंधित ग्राम महसूल अधिकारी, केज, ता.केज,जि.बीड यांनी वाटणी पत्राच्या नोंदी मोठ्या प्रमाणात बाँडवर घेतल्या आहेत, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मा. आमदार महोदया यांनी दिलेले निवेदन तक्रारीचे अनुषंगाने संबंधित तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, सजा साकुड, ता.अंबाजोगाई, जि.बीड यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आली असून जिल्हाधिकारी, बीड यांचे दिनांक २१.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये संबंधित ग्राम महसूल अधिकारी, यांना शिक्षा आदेश बजावण्यात आले आहेत.

तसेच संबंधित ग्राम महसूल अधिकारी, केज, ता.केज, जि.बीड यांचेविरुध्द जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १८.०८.२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केज (जि. बीड) तालुक्यात कार्यरत तलाठी यांच्या कार्यकाळातील कामकाजाची चौकशी करण्याबाबत**

**(१३) २०७७ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) तालुक्यात कार्यरत तलाठी श्रीमती मुळे, यांनी वाटणी पत्रांच्या नोंदी मोठ्याप्रमाणात बॉड वर घेऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान केले असल्याच्या तक्रारी केल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाघेबाभुळगाव येथील सज्जावरील तलाठी श्रीमती, मुळे ह्या शेतकऱ्यांची कामे करीत नाहीत तसेच ऑफिस मध्ये त्यांचे पती कामकाज पाहत असून ते आर्थिक व्यवहाराशिवाय काम करीत नाहीत तसेच गावात तलाठी कार्यालय इमारत असूनही त्या सदर ठिकाणी थांबत नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक थांबवून तलाठी कार्यालय गावात सुरु करण्याबाबतची मागणी श्री. भागवत बळीराम हाडंगे यांनी तहसीलदार, केज. यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्रीमती मुळे यांची तलाठी पदावर कार्यरत असल्यापासून त्यांची संपूर्ण कार्यालयीन रेकॉर्डची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई. यांच्याकडे दिनांक ७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री. भागवत बळीराम हांडगे यांचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) श्रीमती आशा बाळासाहेब मुळे, ग्राम महसूल अधिकारी यांना उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे आदेश क्र.२०२५/आस्था/कावी-३५२/जा.क्र.९९२, दिनांक २७.०३.२०२५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच श्रीमती मुळे यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

**अंबाजोगाई शहरातील मातंग समाज स्मशानभूमीसाठी नवीन १५ गुंठे जमीन उपलब्ध करून देण्याबाबत .**

**(१४) २२२३ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई शहरातील सिद्धार्थ नगर भागातील मातंग समाजाच्या स्मशानभूमीसाठी नवीन १५ गुंठे जमीन उपलब्ध

करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.लोकप्रतिनीधी यांचे दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजीच्या निवेदनास अनुसरून मोजणी नकाशा व आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, अंगाजोगाई यांना तहसिलदार,अंबाजोगाई यांच्या दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. नगर परिषद, अंगाजोगाई यांचेकडून प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदूरघाट, (ता.केज जि. बीड) येथील रामेश्वरवाडी येथे स्वतंत्र तलाठी सज्जाची निर्मीती करण्याबाबत.

**(१५) २३२५ (३०-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदूरघाट, (ता.केज जि. बीड) येथील मौ. रामेश्वरवाडी, ढाकणवाडी व खाडेवाडी या गावाकरीता रामेश्वरवाडी येथे स्वतंत्र तलाठी सज्जाची निर्मीती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वतंत्र तलाठी सज्जाची निर्मितीचा प्रस्ताव आवश्यक त्या अभिलेखासह तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, केज यांना कळविले असून उक्त प्रस्ताव अद्याप सादर करण्यात आला नाही. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव सादर करण्याबाबत रामेश्वरवाडी येथे स्वतंत्र तलाठी सज्जाची निर्मीती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई. यांच्याकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
नांदूरघाट, (ता.केज जि. बीड) येथील रामेश्वरवाडी, ढाकणवाडी व खाडेवाडी या गावाकरीता रामेश्वरवाडी येथे स्वतंत्र तलाठी साझा निर्मितीबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आलेले आहे. शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमोचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर येथील भूमी अभिलेख कार्यालयात जमीन मोजणी नकाशे मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याबाबत

**(१६) २५०४ (२८-०४-२०२५). श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर भूमी अभिलेख कार्यालयात प्लॉट व जमीन मोजणीसाठी पैसे भरल्यापासून ते मोजणी नकाशा मिळेपर्यंत संबंधित मालमत्ता धारकांना येथील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मागणीप्रमाणे सर्व बाबींच्या त्रुटीची पूर्तता केल्यानंतरही तांत्रिक चुका दाखवून नकाशे देण्याबाबत अडवणूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संचालकांना दिलेल्या पत्रात निर्देशित केल्यानुसार दोघाचे निलंबन झाले तर एकाची चौकशी लागली असतानाही येथील कामे अद्याप सुरळीत होत नसल्याने सर्वसामान्य जनतेत नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी भूमी अभिलेख कार्यालयात प्लॉट, जमिनीची मोजणी व नकाशा मालमत्ता धारकांना तातडीने देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर या कार्यालयाची तपासणी उपसंचालक भूमी अभिलेख छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडून करण्यात आली आहे. तसेच मा.विधानसभा सदस्य, लातूर व अन्य एक लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनात गंभीर स्वरूपाचे मुद्दे निदर्शनास आल्याने, उप अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर कार्यालयातील छाननी लिपिक व शिरस्तेदार यांना निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे उपअधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबत उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे यांच्याकडे दिनांक १९.०६.२०२५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) भूमि अभिलेख विभागात जमीन मोजणीसाठी ई-मोजणी व्हर्जन २.० आज्ञावली लागू करण्यात आली आहे. सदर E-Mojani Ver २.० मध्ये नागरीकांना CITIZAN Portal Online उपलब्ध करुन देण्यात आलेले असून मोजणी अर्ज भरणे, फी भरणे, मोजणी अर्जावरील प्रत्येक टप्प्याबाबत माहिती एस एम एस व्दारे उपलब्ध होणे, मोजणी नोटीस ऑनलाईन देणे, मोजणी नकाशा डिजीटल स्वरुपात उपलब्ध करुन देणे इ. सुविधांचा समावेश आहे. तसेच सदर अज्ञावालीत शेतकरी/अर्जदार तसेच संबंधित जमीनीचे लगत धारक, सहधारक यांना पोस्टाद्वारे मोजणी नोटीस पाठविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे ई-मोजणी व्हर्जन २.० आज्ञावलीद्वारे दाखल होणारी ऑनलाईन मोजणी प्रकरणे रोव्हर्सद्वारे मोजणी करुन Coordinate's (अक्षांश रेखांशासह) संबंधित मोजणी अर्जदार यांच्या मोजणी नकाशाची "क" प्रत ऑनलाईन अपलोड करण्यात येत. त्याकरीता अर्जदार यांना कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. सदर कार्यप्रणालीमुळे मोजणी कामामध्ये गतिमानता व पारदर्शकता येवून जमीन मोजणीचा कालावधी कमी झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना येथे मोसंबी उत्पादकांना आर्थिक मदत देऊन फळगळतीवर उपाययोजना करण्याबाबत

**(१७) ३४३३ (२७-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना हा मोसंबीचा जिल्हा म्हणून ओळखला जात असून येथे मागील दोन-तीन वर्षांपासून हवामान बदलामुळे मोठ्या प्रमाणावर फळगळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फळगतीमुळे मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असून त्यांचा खर्चही निघत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने माहिती घेऊन येथील मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह फळगळतीवर उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भरत गोगावले (०५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) माहे सप्टेंबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत, तसेच मे, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी / अवकाळी पावसामुळे मोसंबी फळपीकाचे नुकसान झाल्याचे आढळून आले आहे. सदर नुकसानीच्या अनुषंगाने महसूल, कृषि व ग्रामविकास विभाग यांच्या यंत्रणांकडून संयुक्त पंचनामे करुन ३३ % पेक्षा जास्त नुकसान झालेल्या मोसंबी पीकासाठी महसूल विभागाकडून नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे. याशिवाय पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत देखील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कुळांच्या वारस नोंदी दाखल करण्याबाबत**

**(१८) ५११० (२९-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जमिनीच्या सातबारावरील कुळांच्या वारसा नोंदी करण्यासाठी संगणकीय प्रणालीवर सातबारा उपलब्ध नसल्याबाबत इतर अधिकारात कुळांची वारस नोंद दाखल करता येत नसल्याचे तहसीलदार शिरूर (जि. पुणे) यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कुळांच्या वारस नोंदी दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील जमिनीच्या सातबारावरील कुळांच्या वारसनोंदी करण्याची सुविधा ई-फेरफार प्रणालीमध्ये दिनांक २२.१२.२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

---

**विक्रमगड नगरपंचायत (जि.पालघर) कार्यक्षेत्रातील गाव, पाड्यांना नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(१९) ५७५९ (०१-०५-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड नगरपंचायत (जि.पालघर) कार्यक्षेत्रातील गाव, पाड्यांना सुरक्षित व नियमित पाणी पुरवठा करण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव नगरपंचायत, विक्रमगड विभागाने मागील काही दिवसांपूर्वी राज्य शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) नगरोत्थान महाभियानांतर्गत विक्रमगड नगरपंचायतचा रुपये २४.५१ कोटी किंमतीचा तांत्रिक मान्यतेचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत

शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव सदर अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या दिनांक ०१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

प्रस्तुत पाणीपुरवठा प्रकल्पाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिश्याची रक्कम उभारण्याबाबतची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या अभियानांतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन नवीन प्रकल्पाच्या अनुषंगाने शासन स्तरावरील कार्यवाही सुरू आहे.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण भागात नविन भूमापन सर्व्हे नंबर मिळण्याबाबत

**(२०) ५८९१ (२४-०५-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील चंदूर, कबनूर, कोरोची, तारदाळ व खोतवाडी या ग्रामीण भागातील इचलकरंजी बाजूची औद्योगिक नगरी असून तेथे वाढत असलेली लोकसंख्या विचारात घेता उक्त भागात हद्दवाढीचा प्रस्ताव तयार करुन नविन भूमापनचा सर्व्हे नंबर मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-११-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मौजे चंदूर, कबनूर, कोरोची ,तारदाळ या गावातील मुळ गावठाण हद्दीतील मिळकतीची नगर भूमापन चौकशी होवून मिळकत पत्रिका उघडण्यात आलेल्या आहेत. मौजे खोतवाडी हे गाव गटबांधणी वेळी मौजे तारदाळ या गावातून वेगळे झाले आहे. मौजे खोतवाडी या गावास मुळ गावठाण नसल्याने नगर भूमापन झाले नाही.

मौजे चंदूर, मौजे कबनुर, मौजे कोरोची, मौजे तारदाळ येथील मुळ गावठाणास लागून वाढीव गावठाण हददीतील एकूण अनुक्रमे ५ स.नं. मध्ये एकुण २०२, ९५ स.नं. मध्ये एकुण १५५९, ९ सर्व्हे नं. मध्ये एकुण ९ व २१ स.नं. मध्ये एकुण ७४ मिळकत पत्रिका उघडणेत आल्या आहेत.

(२) "स्वामित्व योजने" अंतर्गत अंतिम झालेल्या गावांच्या विस्तारीत गावठाणांचे नगरभूमापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड नगर परिषद हद्दीतील जुने तहसील कार्यालय दुकान केंद्रासाठी व उर्दु घरासाठी नगर परिषदेकडे हस्तांतरण करण्याबाबत.

**(२१) ५९१६ (३०-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र.सा.बां.ज.२०१०/प्र.क्र.१७६/१०/मिव्य-दिनांक०८.१२.२०११ अन्वये शासन निर्णय महसुल व वन विभाग परिपत्रक क्र.जमीन-०४/२००६ प्र.क्र.३५/ज-१ दिनांक ०८.०९.२००८ तरतुदीनुसार महसुल व वन विभागाच्या सहमतीने जिल्हाधिकारी बीड (महसुल व वन विभाग) यांचेकडे सिटीसर्व्हे क्र. ७४५४ येथील ३७८.३७ चौ.मि.एवढी जागा देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार व शासन निर्णयानुसार सदर जागेत नगर पालिकेस दुकान केंद्रे व उर्दु घरासाठी बीड नगरपरिषद कार्यालयाने मा.जिल्हाधिकारी, बीड यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी यांनी तहसील कार्यालय बीड यांना उक्त प्रयोजनासाठी जमिन देता येईल का,

याबाबत खात्री करून विहित नमुन्यातील माहिती व सहपत्रासह प्रस्ताव उपविभागीय अधिकारी बीड यांच्यामार्फत सादर करण्याचे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यालयाने तहसील कार्यालय, बीड यांना वेळोवेळी उपस्थित केलेल्या त्रृटीची पुर्तता करून प्रस्ताव सादर केला असून उपविभागीय अधिकारी यांनी मा.जिल्हाधिकारी बीड यांना सिटीसर्व्हे नं.७४५४ मधील जुन्या तहसील कार्यालयाची क्षेत्र ३७८.३७ चौ.मि. जागा दुकान केंद्र व उर्दु घरासाठी न.प.बीड यांना जमिन मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) बीड येथील सिटी सर्वे क्र. ७४५४ मधील जुन्या तहसिल कार्यालयाच्या जागेत बीड नगरपरिषदेने सांस्कृतिक सभागृह व दुकान केंद्र बांधावयाचे प्रस्तावित केले असून त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर जागा हस्तांतरीत करणेबाबतची मागणी मुख्याधिकारी नगर परिषद, बीड यांनी केली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करणेबाबत नगरपरिषद,बीड व तहसिलदार, बीड यांना कळविण्यात आले असून त्रुटींची पूर्तता अद्याप करण्यात आलेली नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या कचराकुंडीच्या साहित्य खरेदी निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत**

**(२२) ६५०८ (०५-०५-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून कचराकुंडीच्या संदर्भात साहित्य खरेदी करण्याची निविदा माहिती तंत्रज्ञान विभागाच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या कंपन्यांना देण्यात आल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या कंपन्यांना निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेतलेला आहे त्या कंपन्या एकाच व्यक्तीच्या नावाने असणे, जीएसटी नोंदणी कार्यालयाचा पत्ता देखील एकाच इमारतीचा असून या कंपन्यांचा आर्थिक व्यवहार सांभाळणारी व्यक्ती एकच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विभागाच्या अधिकारी व कंपनीच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या आर्थिक संगनमतामुळे त्यातील एका कंपनीला निविदा मिळविण्यासाठी नियमांमध्ये बदल करणे, त्यातील पात्र झालेल्या कंपनीला निविदा देण्यात येत असून पात्र झालेली कंपनी एकत्र पद्धतीमुळे इतर कंपन्यांकडून साहित्य खरेदी करून त्यातून मिळालेल्या नफा हा इतर सहभाग घेतलेल्या कंपन्यांच्या बँक खात्यावर हस्तांतरित करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदरहू शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्या प्रकरणी निविदा प्रक्रियेची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करणे संदर्भात व सदरील निविदा प्रक्रिया रद्द करून दोषी कंपन्यांना काळ्या यादीत समावेश करुन संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

अभियान संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या अहवालानुसार निविदा प्रक्रियेत पात्र कंपन्यांची जीएसटी नोंदणी, कार्यालयाचा पत्ता व संचालक, इ. माहिती तपासली असता वेगवेगळया असल्याचे स्पष्ट होते.
(३) हे खरे नाही.
राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार १० लि. व ८० लि. कचराकुंडीच्या पुरवठ्याकरीता जेम (GEM) पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने खुली निविदा प्रक्रिया करण्यात आली असून १० लि. व ८० लि. कचराकुंडी खरेदीकरिता प्रत्येकी तीन वेगवेगळया पात्र कंपन्यांसोबत दर करार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोरोची (ता.हातकणंगले) येथील गायरान जागा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर करण्याबाबत...**

**(२३) ७०९० (२०-०७-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोरोची (ता.हातकणंगले) येथील गायरान गट नंबर १०३५ मधील २ एकर जागा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मंडळ अधिकारी, श्री. कबनूर यांना अपर तहसिलदार, इचलकरंजी यांनी दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी लेखी निवेदनाव्दारे दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय, वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-१०-२०२५) :** (१) होय.
(२) व (३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ०४/०८/२०२३ अन्वये मौजे कोरोची, ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने मौजे कोरोची येथील गट नं. १०३५/अ मधील ०.८० हे. आर जागा प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे नावे करण्याकरीता जमीन राखीव ठेवून ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कात त्याची नोंद घेण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिनांक २८/०५/२०२५ रोजी काढलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी विविध प्रशासकीय विभागाचे ना-हरकत दाखले व उप-अधिक्षक भूमी अभिलेख, हातकणंगले यांचेकडील मोजणी नकाशा प्राप्त झाल्यानंतर अंतिम आदेश काढण्याचे प्रस्तावित आहे.

---

**कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२४) ७२४२ (२०-०७-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व त्यांच्या समस्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी दिनांक १५ मे, २०२५ रोजी उपमुख्यमंत्री व मदत व पुनर्वसनमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच सर्वसबंधितांसमवेत बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या मार्गी लावण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (१४-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर बैठकीत निर्देश देण्यात आले आहे की, तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली कोयना प्रकल्पगस्तां संदर्भात दिनांक ०३.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत कोयना प्रकल्पग्रस्तांच्या विविध विषयांबाबत कार्यवाही करण्यासाठी विभागीय आयुक्त यांना नोडल अधिकारी म्हणुन नेमले आहे.

त्यानुषंगाने कोयना प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबीत मागण्यांबाबत विभागीय आयुक्त पुणे यांनी सर्व संबधितांसह बैठक आयोजीत करुन सकारात्मक चर्चा करुन न्यायालयीन बाबी, उपलब्ध दस्ताऐवज इ. बाबी विचारात घेवुन स्वंयस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवाल/प्रस्ताव शासनास सादर करावा.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुण्यातील कोंढवा येथील ३० एकर वनजमीन खाजगी विकासकाला हस्तांतरित केल्याबाबत

**(२५) ७३१० (१९-०८-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील कोंढवा येथील ३० एकर वनजमीन सन १९९८ मध्ये तत्कालीन मा.महसूल मंत्री यांनी पर्यावरण मंत्रालयाची कोणतीही परवानगी न घेता खाजगी विकासकाला बेकायदेशीरपणे हस्तांतरित केल्याबाबतचा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिनीची आजमितीस किमंत रू.२०० कोटी इतकी झाली असतानाही सदर जमिनीच्या गैरवापराबाबत संबंधितांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र यंत्रणेची नेमणूक करण्यासह भविष्यात अशा प्रकारच्या वित्तीय गैरव्यवहारांना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** मुद्दा क्र. (१), (२), (३), (४) व (५) मा. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचेकडील I.A ३०४४-३०४५/२०११, I.A. No.No. २०७९/२००७, I.A. २३०१-२३०२/२००८, I.A. No. टी.एन. २५४९४६/२०२३, I.A. ३९७११/२०२४ गोदावर्मन विरुध्द भारत सरकार व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १५ मे २०२५ रोजी आदेश पारित करुन मौजे कोंढवे बु. ता. हवेली जि. पुणे येथील स.नं. २१ (जुना स.नं. २०अ) मधील चव्हाण कुटूंबास दिलेली वन विभागाची जमीन परत वनविभागास सुपुर्द करणेचे आदेश पारित केलेले आहेत.
जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील. १०/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये मौजे कोंढवे बु. ता. हवेली जि. पुणे येथील स.नं. २१ (जुना स.नं. २०अ) मधील ११ हे. ८९ आर क्षेत्राबाबत झालेली सर्व हस्तांतरणे रद्द करुन ७/१२ सदरी "महाराष्ट्र शासन राखीव वन" अशी नोंद घेणेकामी आदेश पारित करणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने फेरफार क्र. ४०११७ अन्वये मौजे कोंढवे बु. ता. हवेली जि. पुणे येथील स.नं. २१ मधील ११.८९ हे. आर क्षेत्रासाठी "महाराष्ट्र शासन राखीव वन" अशी नोंद घेणेत आली आहे. तसेच दिनांक २६/०६/२०२५ रोजी उक्त मिळकतीचा पंचनामा व ताबेपावतीसह हद्दी खुणा दर्शवून वन विभागास ताबा देणेत आला आहे. सदर पंचनाम्यानुसार सदर क्षेत्र विनावापर गवतपड /मोकळी जागा असलेचे नमूद आहे.

---

**भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यातील अनधिकृत गोदामाबाबत**

**(२६) ७३५२ (१९-०८-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात अनधिकृत गोदामाची संख्या मोठ्या प्रमाणात असून सुमारे ५२५ अनधिकृत वाढीव बांधकाम केलेल्या गोदामाची यादी महसूल विभागाकडे असल्याचे दिनांक १३ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गोदामात देश-विदेशातील अनेक नामांकित कंपन्यांचा वेगवेगळ्या प्रकारचा माल ठेवला जात असून अनेक कंपनीची अत्यंत ज्वलनशील केमिकल्स या गोदामात साठवली जात असल्याने या परिसरात वरचेवर आग लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भविष्यात एखादी दुर्घटना घडू नये याकरिता उक्त तालुक्यातील अनधिकृत गोदामा विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) भिवंडी तालुक्यात एकूण ५२५ अनधिकृत बांधकामे आढळून आली असून सदर अनधिकृत बांधकाम धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे तरतुदींनुसार बांधकाम नियमित करण्याच्या अनुषंगाने तहसिलदार भिवंडी यांनी नोटीस बजावली होती. त्यानुषंगाने सन २०२२ पासून ८६ अर्ज अनधिकृत बांधकाम धारकांनी बांधकाम नियमित करण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडे अर्ज केलेले आहेत. सदर अर्जापैकी ११ अर्जामध्ये अनधिकृत बांधकाम नियमितीकरण आदेश पारीत केले आहेत, ३ अर्जामध्ये त्रुटी असल्याने अर्ज निकाली काढण्यात आले आहेत व १३ प्रकरणामध्ये अनधिकृत बांधकामधारकांना शासकीय भरणा करणेबाबत कळविणेत आले आहे.

तदनंतर नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३/१०/२०२४ रोजीचे अधिसूचनेनुसार भिवंडी तालुक्यातील ३२ गावाकरीता व दिनांक ०७/१०/२०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार ११६ गावांकरीता असे एकूण १४८ गावांकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची विशेष नियोजन प्राधिकारी म्हणुन नियुक्ती केली आहे. तसेच मौजे-खारबांव व इतर गावांच्या क्षेत्राच्या खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क करीता दिनांक २५/०९/०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार भिवंडी तालुक्यातील एकूण ९ गावासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. वरील एकुण ८६ अर्जापैकी ५९ अर्ज महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील आहेत. सध्यस्थितीत भिवंडी तालुक्यातील १० गावांकरीता जिल्हाधिकारी हे नियोजन प्राधिकारी आहेत.

भिवंडी तालुक्यात सन २०२४-२५ या वर्षामध्ये ज्वलनशील केमिकल्स साठवणुक केल्यामुळे २ गोदामांना आग लागल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर गोदाम धारकांना व्यवसाय बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत.

---

**पालघर जिल्ह्यातील मच्छीमारांना दुष्काळ जाहीर करुन आर्थिक मदत करण्याबाबत**

**(२७) ७३९४ (१९-०८-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात पश्चिम किनारपट्टीवरील मच्छीमारांना मागील चार महिन्यांपासून खोल समुदात जाऊनही मासे मिळत नसल्याने रिकाम्या हाती किंवा किरकोळ मासे घेऊन परतावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासे मिळत नसल्याने निराश मच्छीमारांनी किनाऱ्यावर बोटी नांगरून ठेवल्या असून, डहाणूच्या किनारपट्टीवर मासळी बाजार ओस पडला असून मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना ओला दुष्काळ वा दुष्काळामध्ये आर्थिक मदत देण्यात येते त्याचप्रमाणे मासेमारीही समुद्रावरील एक प्रकारची शेती असल्याने या मासेमारी करणाऱ्या बांधवांना शासन आर्थिक मदत देणार काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मत्स्यदुष्काळ जाहीर करून मच्छीमारांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१०-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्याचे माहे जानेवारी,फेब्रुवारी, मार्च २०२५ या कालावधीचे मत्स्योत्पादन ८३३१ मे.टन इतके आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे अल्याळी (नवापाडा) (ता.जि.पालघर) येथील गुरुचरण जमिनीवर राहणारे आदिवासी भूमीहीन होणार असल्याबाबत

**(२८) ७३९८ (१९-०८-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अल्याळी (नवापाडा) (ता.जि.पालघर) येथील जुना सर्व्हे क्र.६५ आणि नवीन गट क्र.१९८ या गुरुचरण जमिनीवर मागील ४० वर्षांपासून घरे बांधून राहणारे ५८ आदिवासी भूमीहीन होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाला विनंती करुन या आदिवासी बांधवांना न्याय देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल Suo Moto Public Interest Litigation No ०२/२०२२ मधील मा. न्यायालयाच्या दिनांक १५.०९.२०२२ रोजीच्या आदेश तसेच शासन निर्णय दिनांक १२.०७.२०११ मधील तरतूदीनुसार शासकीय गुरचरण जमिनीवरील खाजगी व्यक्ती/संस्थांची अतिक्रमणे नियमानुकूल करता येत नसल्याने मौजे अल्याळी, ता.जि. पालघर येथील जुना स.नं. ६५, नवीन ग.नं. १९८/३/अ मधील सरकार (गुरचरण) जमिनीवर असलेली १७ व्यक्तींचे ७.२४.० हे.आर. क्षेत्रावरील शेतीचे अतिक्रमण व ११ व्यक्तींचे ०.२३.५० हे.आर. क्षेत्रावरील वाणिज्य वापराचे शेड, तबेला, पत्र्याची चाळ, गोदाम इ. चे अतिक्रमण दिनांक १२/०२/२०२५ रोजी निष्कासित करण्यात आलेले असून रहिवास प्रयोजनासाठी केलेले कोणतेही अतिक्रमण अद्यापपर्यंत निष्काषित करण्यात आलेले नाही. पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने मौजे अल्याळी (नवापाडा) (ता. जि. पालघर) येथील जुना सर्व्हे क्र.६५ आणि नवीन गट क्र. १९८ या गुरुचरण जमिनीवरील रहिवास प्रयोजनासाठी केलेल्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने नियमानुसार विभागीय आयुक्त कोंकण यांच्यामार्फत प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक २७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले आहे.

---

## पुणे जिल्ह्यातील वन विभागाचे संरक्षित वनजमिनींवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(२९) ७४४६ (१९-०८-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वन विभागाने ३६ हजार हेक्टर वनजमिनींचे सर्वेक्षण करून २२ हजार हेक्टर जमीन परत घेतल्याचे असून उर्वरित १४ हजार हेक्टर जमिनीबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरक्षित वनजमिनींवर अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, शेतीचा वापर, झोपडपट्ट्या आणि गोठे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुण्यातील राखीव वनक्षेत्रातील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश देण्यात आले असून या आदेशांची अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, वन विभागाकडून रिकाम्या जमिनीचा ताबा घेऊन तातडीने संरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार वन जमिनींवरील अतिक्रमणांविरुद्ध कार्यवाही करताना झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन, न्यायालयीन खटले आणि पर्यायी जागा देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील वनक्षेत्र ४३५३२.४६ एवढे क्षेत्र महसूल विभागाकडे देखभाल व व्यवस्थापनासाठी वनविभागामार्फत देण्यात आले होते. शासनाच्या आदेशाच्या अनुषंगाने महसुल विभागाच्या ताब्यातील क्षेत्र वनविभागाच्या ताब्यात हस्तांतर करण्याबाबत कळविण्यात आल्यानुसार २४३२१.४३ हेक्टर जमीन महसूल विभागाकडून परत घेण्यात आली आहे. उर्वरित पुणे वनविभागातील १४५९२.०० हेक्टर व जुन्नर वनविभागातील ४२७७.०३ असे एकुण १८८६९.०३ क्षेत्र महसूल विभागाकडुन परत करण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

होय, हे खरे आहे.

(२) पुणे वनविभाग व भोर वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील सुमारे १२३४५.०० हेक्टर इतके क्षेत्र निर्वणीकरण न करता भुमिहीन शेतकरी, स्वांतत्र सैनिक व पुनर्वसन झालेले लोक इत्यादी प्रवर्गाना वाटप करण्यात आले आहे. तसेच राखीव वनक्षेत्राचे वाटप व्यतिरिक्त वनजमिनींवर अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, शेतीचा वापर, झोपडपट्ट्या, गोठे, विखुरल्या प्रमाणे झालेली पक्की घरे, जुनी गावठाणे, समाजमंदीरे इत्यादी अतिक्रमीत २२४६.०० हेक्टर क्षेत्र असल्याचे आढळुन आले आहे. जुन्नर वनविभागांतर्गत महसूल विभागाकडून आजअखेर ताब्यात घेण्यात आलेल्या राखीव वनक्षेत्राध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, शेतीचा वापर, झोपडपट्ट्या आणि गोठे आढळल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) मुद्दा क्र. (३), (४), (५) व (६) या संदर्भात मा. न्यायालय नवी दिल्ली यांचेकडील दिनांक १५.०५.२०२५ रोजी देण्यात आलेल्या निकालाचा निष्कर्षामधील मुददा क्र. (iv), (v), (vi) व (vii) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार पुणे वनविभागामध्ये १२३४५.०० हेक्टर इतके क्षेत्र निर्वणीकरण न करता वाटप करण्यात आलेले व अतिक्रमीत राखीव वनक्षेत्र २२४६.०० (हेक्टर) क्षेत्र तसेच जुन्नर वनविभागातील ४२७७.०३ क्षेत्र इ. क्षेत्र मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार एक वर्षामध्ये सदर क्षेत्र वनविभागाच्या ताब्यात देण्याबाबत महसुल विभागामार्फत कार्यवाही चालु आहे यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यस्तरीय विशेष तपास पथक (एस.आय.टी) स्थापन करण्यात येणार आहे.

---

## राज्यातील सर्व भूमीअभिलेख उपअधीक्षक कार्यालयाची तपासणी करण्याचे आदेश जमाबंदी आयुक्त व संचालक यांनी दिल्याबाबत

**(३०) ७६५२ (२०-०७-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व भूमीअभिलेख उपअधीक्षक कार्यालयाची तपासणी करण्याचे आदेश जमाबंदी आयुक्त व संचालक यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार मोजणी, फेरफार नोंदी, चलन, बिनतक्रारी फेरफार, शून्य क्षेत्र मिळकतपत्रिका तपशील, पोटहिस्से व स्वामित्व योजना अशा विविध कामांची तपासणी होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तपासणीत आढळलेल्या त्रुटींवर संबंधित जिल्हा अधीक्षक, उपसंचालक व तपासणी अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूमीअभिलेख कार्यालयांमध्ये नागरिकांना वारंवार फेरफार व स्वामित्वासंदर्भात त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, स्वामित्व योजनेतून तयार होणाऱ्या मिळकत पत्रिका, मालकी हक्काचे दस्तऐवज, तसेच भूमापन प्रक्रियेत होणाऱ्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणते धोरण आखले आहे,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे,

संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी तपासणीबाबतचा अनुपालन अहवाल तपासणी झालेल्या कार्यालयाकडून तपासणी झाल्याच्या दिनांकापासून पुढील ३० दिवसांत प्राप्त करुन घेणेबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांनी सूचना दिलेल्या आहेत.

(४) अंशतः खरे आहे.

(५) स्वामित्व योजने अंतर्गत एकूण ३०२८९ गावांपैकी २०३६४ गांवाचे काम पूर्ण करण्यात आले असून ३२,९७,७७१ मिळकत पत्रिका तयार करण्यात आल्या आहेत. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महा. राज्य, पुणे यांच्याकडील दिनांक ११.१२.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये अंतिम झालेल्या गावांच्या कामाची गुणवत्ता तपासणी व दुरुस्ती करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने संबंधित जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांच्यास्तरावर तपासणी अंती दुरुस्त्यांचे आदेश पारीत करण्यात येत आहेत.भूमापनबाबत संपूर्ण राज्यात ई मोजणी व्हर्जन II आज्ञावली लागू करणेत आलेली आहे. सदर आज्ञावलीमध्ये नागरीकांनी ऑनलाईन मोजणी अर्ज केल्यानंतर प्रत्येक टप्यावर SMS ची सुविधा देण्यात आलेली असून आधुनिक Rover तंत्रज्ञानाच्या आधारे मोजणी करुन अक्षांश-रेखांशासहीत मोजणी नकाशाची ‘क प्रत’ त्यांचे लॉगिनला पाठविण्यात येते. ई मोजणी व्हर्जन II आज्ञावलीमुळे मोजणी कामात अचुकता आलेली असुन मोजणी काम जलद गतीने होत आहे.

प्रलंबित मोजणी प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील भूमि अभिलेख कार्यालयांना एकूण १७०५ Rover पुरविण्यात आले आहेत. विभागातील अधिनस्त तालुक्यात मोजणी प्रकरणे प्रलंबित असल्यास अन्य तालुक्यातील कर्मचाऱ्यांच्या सेवा वापरून प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली काढण्याबाबत नियोजन करण्यात येते.

मोजणी प्रकरणांचा जलद निपटारा होणेकामी भूकरमापकांना सहाय्यक म्हणून भूकरमापक मदतनिस यांची नेमणूक देखील करण्यात आलेली आहे.

भूमि अभिलेख कार्यालयात प्राप्त होणाऱ्या मोजणी प्रकरणांचा निपटारा होणेकामी व खरेदी- विक्री कामी करण्यात येणारी मोजणी ही खाजगी परवानाधारक भूमापक यांचेमार्फत करणेबाबत दिनांक१० ऑक्टोबर २०२५ रोजी शासन अधिसूचना

प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(६) व (७) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील वाढीव गावठाणांतील मिळकतींना प्रॉपर्टी कार्ड देणे व आधुनिक पध्दतीने सर्व्हे करण्याबाबत

**(३१) ७७३५ (२०-०७-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील वाढीव गावठाणातील मिळकतींना प्रॉपर्टी कार्ड देणे व आधुनिक पध्दतीने सर्व्हे करण्यास महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मान्यता दिली असून जमावबंदी आयुक्त कोल्हापूर यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप काम करण्यास सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त मिळकतींना तातडीने प्रॉपटी कार्ड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) कोल्हापूर शहराच्या शिल्लक क्षेत्राचा नगर भूमापन होवून प्रॉपर्टी कार्ड तयार होणेकामी नक्शा प्रकल्पाचे कार्यपध्दती प्रमाणे महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राच्या मोजणीकामी रक्कम रुपये ९३,७७,५००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर लागणारा निधी करीता आयुक्त महानगरपालिका कोल्हापूर यांना दिनांक २०.०५.२०२५ चे पत्रान्वये निधी मागणी केलेली आहे. तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे, यांनी ड्रोनव्दारे नगर भूमापन करण्याची प्रमाणित कार्यपध्दती निश्चित केली आहे. नक्शा प्रकल्पाचे कार्यपध्दतीनुसार कोल्हापूर शहराच्या विस्तारवाढ मोजणी कामी ड्रोन फ्लाय करणेकामी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडून संचालक भारतीय सर्व्हेक्षण संस्था, महाराष्ट्र व गोवा, पुणे यांना दिनांक ११.०६.२०२५ रोजी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(४) जिल्हा नियोजन समिती कोल्हापूर यांचे कडून निधी प्राप्त झालेनंतर व सर्व्हे ऑफ इंडिया डेहराडून यांचे कडून ड्रोन फ्लाय करणेकामी प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर कोल्हापूर शहरातील वाढीव गावठाणातील मिळकतींना आधुनिक पध्दतीने सर्व्हे करुन प्रॉपर्टी कार्ड देणेबाबत कार्यवाही सुरु करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या पशुधन विकास अधिकारी (गट-अ ) या पदासाठी BVSC आणि AH अभ्यासक्रमातील इंटर्नशिप करणा-या विद्यार्थ्यांच्या पात्रतेस मान्यता देण्याबाबत

**(३२) ७८८१ (०९-१०-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या पशुसंवर्धन विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या पदांसाठी २,७९५ पदांची भरती सुरु करण्यात आली असुन या परिक्षेसाठी BVSC आणि AH

अभ्यासक्रमातील इंटर्नशिप करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पात्रतेस मान्यता देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र व्हेटरनरी स्टुडंट्स असोशिएशनने शासनाकडे केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लंम्पी स्किन डिसीजचा सन २०२२ मध्ये उद्रेक झाल्यानंतर शासनाने इंटर्नशिप करणाऱ्या विद्यार्थ्यांना बाधित जनांवराची ओळख, उपचार, आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची जबाबदारी दिली असताना राज्यभरात ३५० हून अधिक इंटर्न्सनी गावांगावात जाऊन अत्यंत कौतुकास्पद आणि प्रभावी कामगिरी बजावली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन इंटर्नशिप करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पात्रतेस मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-११-२०२५) :** (१) हे खरे आहे
(२) हे खरे आहे. शासन निर्णय क्रमांक, डी आय एस-२०२२ /प्र.क्र. १३८/ पदुम-४ दिनांक १६ सप्टेंबर २०२२ अन्वये राज्यातील गोवंशय पशुधनामधील उद्भवलेला विषाणूजन्य लंपी चर्मरोग नियंत्रणात आणण्याकरिता पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता छात्र (इंटर्नीज) यांना मानधन तत्वावर लसीकरण करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती.
(३) व (४) सेवाप्रवेश नियमानुसार पशुधन विकास अधिकारी या पदासाठी पशुवैद्यकीय शाखेची पदवी आवश्यक आहे तसेच भारतीय पशुवैद्यकीय परीषद कायदा, १९८४ नुसार राज्य पशुवैद्यकीय परीषद/ भारतीय पशुवैद्यक परीषदेकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे शैक्षणिक अर्हतेची पूर्तता होणे गरजेचे आहे. इंटर्नशिप करणा-या विद्यार्थ्यांकडे पदवी अभ्यासक्रम पुर्ण झाला नसल्याने ते शैक्षणिक अर्हततेची पूर्तता करीत नाहीत त्यामुळे याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

---

## कोरपना तहसील कार्यालयातील(जि.चंद्रपूर) खसरा व पाहणी पत्रकाचे संगणकीकरण करण्याबाबत

**(३३) ८०७० (२०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तहसील कार्यालयातील खसरा व पाहणी पत्रकाचे संगणकीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजी मा.प्रधान सचिव, महसूल विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) डिजीटल इंडिया भुमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (DILRMP) अंतर्गत महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६.०६.२०१४ व ३१.०३.२०१७ अन्वये सर्व जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार राज्यातील सर्व तहसिलदार, उप अधीक्षक भुमि अभिलेख आणि नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालयातील महत्वाच्या जुन्या अभिलेखांच्या स्कॅनिंगचे काम करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

DILRMP अंतर्गत स्कॅनिंग करण्यासाठी निश्चित केलेल्या अभिलेखांच्या प्रकारांपैकी नागपुर महसुली विभागातील तहसिल कार्यालयांच्या जुने सातबारा, जुने फेरफार नोंदवही, चालु खाते उतारा (गा.न.नं.८अ), बंदोबस्त मिसल, वाजीब उल अर्ज, निस्तार पत्रक, सन १९५४-५५ अधिकार अभिलेख पंजी व कोतवाल बुक पंजी अशा अभिलेखांचा समावेश आहे. तथापि, यामध्ये खसरा व पाहणीपत्रकाचा समावेश नव्हता. यास्तव, जमाबंदी आयुक्त आणि

संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाच्या दिनांक २९.१०.२०२५ च्या पत्राव्दारे जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांच्याकडून खसरा व पाहणीपत्रक या अभिलेखांचे स्कॅनिंग करण्यासाठी पानांची संख्या व आकार याची माहिती मागविण्यात आली आहे. सदरची माहिती प्राप्त होताच स्कॅनिंग करण्याची प्रक्रिया राबविण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या किनारपट्टीत वाढ झाल्याबाबत**

**(३४) ८४२९ (१९-०८-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशाची सागरी सुरक्षा तसेच पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी किनारपट्टीची लांबी नेमकी किती आहे यावरुन अलिकडेच भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सर्वेक्षण अहवालाच्या आधारे याची अद्यावत आकडेवारी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशाच्या किनारपट्टीची लांबी ७५१६.६० किलोमीटरवरुन ११,०९८.८१ कि.मी. इतकी निश्चित करण्यात आली असून राज्याच्या किनारपट्टीची लांबीही ७२० कि.मी.वरुन ८७७.९७ कि.मी. इतकी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार महाराष्ट्र राज्याची १५८ किलोमीटरने वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, किनारपट्टीच्या लांबीवाढीबाबत केंद्रीय बंदरे मंत्रालयाने परिपत्रक प्रसिध्द केले असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र सागरी मंडळांतर्फे करण्यात येऊन किनारा लांबी संदर्भातील संभाव्य कारणांचा परिपत्रकात उल्लेख असल्याचे मा.उप जलविज्ञानशास्त्रज्ञ, महाराष्ट्र सागरी मंडळांने सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (३०-०९-२०२५) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाचे पत्तन, पोत परिवहन आणि जलमार्ग मंत्रालय (Ministry of Ports, Shipping and Waterways) यांचे दिनांक २९.०४.२०२५ रोजीचे परिपत्रकानुसार भारत देशातील विविध राज्यांची सागरी किनारपट्टीची एकूण लांबी ११,०९८.८१ कि.मी. नमूद करण्यात आली असून महाराष्ट्र राज्याची किनारपट्टीची लांबी ८७७.९७ कि.मी. इतकी नमूद करण्यात आली आहे.
(४) व (५) केंद्र शासनाचे पत्तन, पोत परिवहन आणि जलमार्ग मंत्रालय (Ministry of Ports, Shipping and Waterways) यांचे दिनांक २९.०४.२०२५ रोजीचे परिपत्रकामधील मुद्दा क्र. ५ मध्ये किनारा लांबी संदर्भातील संभाव्य कारणांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उध्दवत नाही.

---

**मौजे नळदुर्ग (जि.धाराशिव) शहरातील जागा महात्मा बसवेश्वर स्मारक उद्यानासाठी मंजूर करण्याबाबत**

**(३५) ८५७७ (१९-०८-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नळदुर्ग (जि.धाराशिव) शहरातील जमीन सर्वे नं. २३६/२/२ मधील क्षेत्र ०.४८ हे. आर जागा महात्मा बसवेश्वर स्मारक उद्यानासाठी मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्याधिकारी नगरपरिषद नळदुर्ग यांनी नळदुर्ग (रूरल) येथील शासकीय गायरान जमीनीची जागा महात्मा बसवेश्वर स्मारक येथील उद्यान विकसित करण्यासाठी मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नळदुर्ग ही “क” वर्ग नगरपरिषद असून नगरपरिषदेची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे सदर जागेचे

मुल्यांकनाप्रमाणे फिस (शुल्क) माफ करून जागा हस्तांतरण करण्याची विनंती मुख्याधिकारी नगरपरिषद, नळदुर्ग यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) नगरपरिषद नळदुर्ग, जिल्हा धाराशिव यांना महात्मा बसेवश्वर स्मारक येथील उद्यान विकसित करण्यासाठी नळदुर्ग शहरातील सर्वे नं. २३६/२/२ मधील क्षेत्र ०.४८ हे.आर क्षेत्र जागेची मूल्यांकन किंमत रु. ४८,५२,१००/- इतके भोगवटामूल्य नगरपरिषद, नळदुर्ग यांच्याकडून वसूल करण्यासह विभागाच्या दिनांक ०६.०८.२०२५ रोजी पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई(जि. पालघर) तहसील कार्यालयातील मंजूर पदे**
**गत अनेक वर्षापासून रिक्त असल्याबाबत.**

**(३६) ९५१० (२०-०७-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तहसील कार्यालयातील एकूण मंजूर १४४ पदांपैकी ६९ पदे ही भरलेली असून उर्वरित ७५ पदांसाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियोजित आकृतीबंधाप्रमाणे रिक्त असलेली पदे भरण्यासाठी तहसील कार्यालय वसई यांच्याकडून जिल्हाधिकारी पालघर यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, नागरिकांची विहित मुदतीत कामे न होणे, अप्रशिक्षित कर्मचारी असल्याने दस्तऐवज गहाळ होणे, अनेक महिने टपाल प्रलंबित असणे आवश्यक सुनावण्या न होणे इत्यादी समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विहित मुदतीत नागरिकांची कामे होत नसल्यामुळे त्यांना अधिकचे पैसे खर्च करून मध्यस्थी व्यक्तींमार्फत कामे करावी लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वसई विरार परिक्षेत्रातील नागरिकांना विहित मुदतीत नागरीसुविधा मिळण्यासाठी सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-११-२०२५) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

वसई (जि. पालघर) तहसील कार्यालयामध्ये एकूण मंजूर १४४ पदांपैकी ९० पदे ही भरलेली आहेत. उर्वरित ५४ रिक्त पदांपैकी बहुतांश पदे रिक्त गट-क संवर्गातील ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) व महसुल सेवक (कोतवाल) यांची आहेत. सदर संवर्गाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) गट-क संवर्गातील ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) व महसुल सेवक (कोतवाल) या संवर्गाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहे. मा.न्यायालयाच्या निर्णयानंतर सदरची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यात ऑनलाईन सीएससी सेंटरवरुन किंवा तलाठी कार्यालयामधून सातबारे निघत नसल्याबाबत**

**(३७) ९७३४ (१९-०८-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यात माहे एप्रिल, २०२५ मध्ये कोणत्याच ऑनलाईन सीएससी सेंटरवरुन किंवा महसूल विभागाच्या कोणत्याही तलाठी कार्यालयातून सातबारे निघत नसल्याने शेतक-यांची मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातबारा मिळत नसल्याने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मिळणारे सोसायटीचे कर्ज शेतक-यांना मिळण्यास अडचण निर्माण झाली असून त्यांना सोसायटीच्या कर्जापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन सातबारा निघत नाही तोपर्यंत ऑफलाईन सातबारा देण्यात यावा, अशी मागणी उक्त तालुक्यातील शेतक-यांसह संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सावली तालुक्यात एप्रिल, २०२५ मध्ये एकूण १००२० ऑनलाईन सातबारांचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सावली तालुक्यातील शेतकऱ्यांना माहे एप्रिल-२०२५ मध्ये ७/१२ व ८ अ वाटप करण्यात आले असून बँक व सहकारी संस्था यांनी शेतकऱ्यांना कर्जाचे वाटप केलेले आहे.

(३) हे खरे नाही.

तलाठी यांनी शेतकऱ्यांना ऑनलाईन ७/१२ दिल्यामूळे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समितीकडून ऑफलाईन सातबारा मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोहकल व वाकी खुर्द (ता.खेड जि.पुणे) येथील आदिवासी व इतर मागासवर्गीय समाजाच्या जमीनीबाबत**

**(३८) १०३३५ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहकल व वाकीखुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील आदिवासी व इतर मागासवर्गीय समाजाच्या शेतकऱ्यांची जमीन शासनाने बाधित कुटुंब यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी अटी व शर्ती घालून एका खाजगी कंपनीला हस्तांतरण ४४ वर्षापूर्वी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाधित शेतकरी कुटुंबाच्या जागेवर अद्यापपर्यंत कोणतीही कंपनी नसल्यामुळे सुरुवातीपासूनच सदर शेतकरी जमीन कसून उदरनिर्वाह करीत असून सन २०१६ ते २०१९ या कालावधीत नायब तहसिलदार, (खेड) यांनी पंचनामा करून शेतकरी शेती करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याचदरम्यान मोजणी करण्याच्या नावाने सदर जमीन शेतकऱ्यांकडून गैर फौजदारीने जबरदस्तीने कंपनीने तार कुंपण केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२१ मध्ये चाकण पोलीस स्टेशनमार्फत फौजदारी संहिता १९७३ कलम १४५ नुसार उपविभागीय

अधिकारी व तहसीलदार, खेड यांना प्रकरण वर्ग केले, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये तत्कालीन अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी बाधित शेतकरी यांच्या अर्जावर शर्त भंग मान्य करून संबंधित कंपनीला कोट्यवधी रुपये दंड ठोठावला मात्र जमीन मूळ शेतकरी यांना प्रदान न करता परस्पर अनधिकारात शासन अटी व शर्ती परस्पर रद्द करून आदेश पारित केले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधित शेतकरी यांना न्याय देण्यासाठी आदिवासी व इतर मागासवर्गीय समाजातील शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-११-२०२५) :** (१) होय हे अंशतः खरे आहे. मौजे रोहकल येथील जमीन गट नंबर १०४ ते १११ व गट नंबर ११३, ११४ तसेच मौजे वाकी खुर्द येथील गट नंबर १८० या गटावरील क्षेत्राची खरेदी मे. लॅक्मे लि. मुंबई तर्फे सेक्रेटरी विनायक सदाशिव मुळे यांनी केल्याचे दिनांक १७/०४/१९८२ च्या फेरफार क्रंमाक १४९ वरून दिसून येत आहे.रोहकल येथील गट क्रंमाक १०३ मौजे वाकी खुर्द येथील गट नंबर १८० ही इतर मागासवर्गीय/ बिगर आदिवासींकडील जमीन खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ०३/०३/१९८२ च्या आदेशान्वये मे. लॅक्मे (मुंबई) यांना महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ अन्वये खरेदी करणेसाठी परवानगी दिली होती.तसेच श्री. गोविंद गंगाराम ठाकर व इतर ६ रा. मौजे रोहकल यांनी जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील आदेश दिनांक ५/८/१९८२ अन्वये व श्री. मारूती तवाजी ठाकर व इतर ५ रा. मौजे रोहकल यांनी जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील आदेश दिनांक ११/११/१९८२ अन्वये सदरची जमीन मे. लॅक्मे (मुंबई) लि. यांना विक्री करणेसाठी पुर्व परवानगी घेतलेचे दिसून येते. तथापि सदरचा परवानगी आदेश दिनांक ५/८/१९८२ मध्ये या परवानगी आदेशात नमूद जमीनीच्या ७ खातेदारांच्या कुंटूबातील किमान दोन व्यक्तीना सदर लॅक्मे इंडिया कंपनीच्या कारखान्यामध्ये नोकरीस घ्यावे अशा अटी व शर्तीवर सदरची विक्री परवानगी दिलेचे दिसून येते.
(२) नायब तहसिलदार खेड यांचे उपस्थित मंडळ अधिकारी चाकण यांनी दिनांक २४/०६/२०१९ रोजी पंचनामा केला आहे. सदर पंचनाम्यानुसार जागेवर यापूर्वी तारेचे कंपाऊड काढून नवीन सिमेंट पाईप तारेचे कंपाऊड केले आहे. सदर जागा मोकळी व पड असुन कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम केले नाही. तसेच बिनशेती वापर केलेला नसून आजरोजी मोकळी व पड असुन त्यामध्ये पक्क्या स्वरुपाचे कोणत्याही प्रकारचे बांधकाम केल्याचे दिसून येते नसलेचे दिनांक २८/०६/२०२५ रोजीचे पंचनाम्यानुसार दिसून येते.

मुद्दा क्र. (३) व (४) होय अंशत: खरे आहे.पोलीस निरीक्षक चाकण पोलीस स्टेशन यांचेकडील पत्र दिनांक २१/०१/२०२१ अन्वये सदर जमीनीवर लॅक्मे (ट्रेन्ड) इंडिया लि. कंपनी व ठाकर समाजातील लोकांचा जमीन मालकी हक्क ताबा वहीवाटीवरून वाद असलेने दोन गटात वाद होऊन कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन शांतता भंग होण्याची शक्यता असल्याने, त्यामुळे जमिनीचे वादावरून शांतता भंग होऊ नये म्हणून सदर प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४५ प्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी तालुका दंडाधिकारी, तहसिल कार्यालय खेड यांचे कडे वर्ग करण्यात आलेले आहे.

मुद्दा क्र. (५) व (६) महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ अन्वये सदर कंपनिला जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १५/०५/१९८० च्या आदेशान्वये देण्यात आलेल्या परवाण्यातील अटी व शर्तीचा सदर कंपनीने भंग केला असल्यामूळे अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ०३/१०/२०२२ व दिनांक १८/१०/२०२२ च्या आदेशान्वये अनुक्रमे ३,५२,०७,७१२ /- व ५,६०,४५,२३८/- अशी शर्तभंगाची ७५% रक्कम वसूल करुन झालेला शर्तभंग नियमानुकूल केलेला आहे.

सदर आदेशाविरुध्द श्री. संतोष विलास उबाळे व इतर यांनी महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, पुणे खंडपीठ, पुणे यांजकडे अपील दाखल केले असुन, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**औसा व निलंगा (जि.लातूर ) तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम करण्याबाबत**

**(३९) १०३४९ (२०-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व निलंगा (जि.लातूर ) तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम शासनाने मंजूर केले असतानाही सदरील कामे अद्यापही सुरु करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे तात्काळ सुरु करण्याबाबत जिल्हाधिकारी लातूर यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये औसा तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागास सूचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त कार्यालयाची बांधकामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ता.औसा जि.लातूर अंतर्गत ०८ मंडळ अधिकारी व ४७ तलाठी कार्यालये बांधकामांना शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक २७.०६.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, मौ.कासारशिरसी ता.निलंगा जि.लातूर अंतर्गत ०४ मंडळ अधिकारी व २३ तलाठी कार्यालये तसेच, ता.निलंगा, जि.लातूर अंतर्गत ०६ मंडळ अधिकारी व ३३ तलाठी कार्यालये बांधकामांना शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक १४.०७.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

ता.औसा अंतर्गत ०१ मंडळ अधिकारी व ०२ तलाठी कार्यालयांची, मौजे कासारशिरसी ता.निलंगा अंतर्गत रामलिंग मुदगड येथील तलाठी कार्यालयांची बांधकामे व ता.निलंगा अंतर्गत ०१ मंडळ अधिकारी व २२ तलाठी कार्यायांची बांधकामे सुरू आहेत. उर्वरित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या कामांकरीता जागा उपलब्धतेकरीता क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

औसा तहसिल कार्यालयात झालेल्या दिनांक २१.०१.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी कामे लवकर सूरू करण्याबाबतच्या तोंडी सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयांच्या बांधकामांची कामे सुरू करण्याबाबत संबंधित कंत्राटदारास क्षेत्रिय स्तरावरून लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात भोगवटादार वर्ग २ भोगवटदार वर्ग - १ मध्ये रुपांतरीत**
**करण्याची परवानगी देण्याबाबत**

**(४०) १०७५२ (२०-०७-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोगवटदार वर्ग-२ ब-सत्ता व नविन अविभाज्य शर्त प्रकारच्या भूखंडास विक्री करण्याबाबत व भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्याबाबतची परवानगी देण्याच्या अनुषंगाने पूर्व परवानगी न घेता झालेल्या हस्तांतरणाबाबत व वापरातील बदलाबाबत शर्तभंग नियमानुकूल करण्याबाबतचे अधिकार पूर्वीप्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांना प्रदान केल्यास व त्यांच्या अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३७ अ नुसार शासकीय जमिनीची प्रत्येक विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशकांचा (एफ.एस.आय.) वापर, हस्तांतरणीय विकास हक्कांचे (टी.डी.आर.) हस्तांतरण किंवा वापरातील बदल इ. बाबत विहित नजराण्याची रक्कम आकारुन शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असलेबाबतची तरतूद आहे.

तथापि, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये शासकीय जमिनीवर वापर बदल/विक्री इ. बाबत झालेले शर्तभंग कोणत्या स्तरावरुन नियमित करावे याची विशिष्ट तरतूद नाही. सदर तरतूद विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या किनारपट्टीवर जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापरासाठी कारखाने उभारण्यात येणार असल्याबाबत

**(४१) ११०६५ (१९-०८-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील किनारपट्टीवर जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापरासाठी कारखाने उभारण्यात येणार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचे नेमके उद्दिष्ट काय आहे,

(३) असल्यास, कुशल मनुष्यबळ व योग्य प्रशिक्षणाकरिता शासन कोणती उपाययोजना केली आहे,

(४) असल्यास, याकरिता निधीची तरतूद करण्यात येणार आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (०६-१०-२०२५) :** (१) होय,

गृह विभाग शासन निर्णय दिनांक १६/५/२०२५ अन्वये, महाराष्ट्र जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर धोरण- २०२५ जाहीर करण्यात आले आहे.

(२) महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर हे उद्योग प्रस्थापित करण्यासाठी चालना देऊन, परदेशी जहाजांवरील अवलंबित्व कमी करणे, सागरी वाहतूक, ऊर्जा सुरक्षा तसेच राष्ट्रीय संरक्षणात स्वावलंबन वाढविणे, देशाबाहेर जाणाऱ्या परकीय चलनाचा ओघ कमी करणे, मेक-इन-इंडिया कार्यक्रम व लघु-मध्यम उद्योगांना प्रोत्साहित करणे, रोजगार निर्मिती आणि संशोधन व विकास (Research & Development) ही सदर धोरणाची उद्दीष्ट्ये आहेत.

(३) सदर धोरणामध्ये, कुशल मनुष्यबळ व प्रशिक्षण यासाठी कौशल्य विकास केंद्रांची स्थापना आणि विद्यमान कौशल्य संस्थांना बळकट करण्यास प्रोत्साहन देण्याबाबत तसेच, केंद्र व राज्य शासनाच्या कौशल्य विकास उपक्रमांचा वापर करण्याबाबत तरतूदी आहेत. याशिवाय, खाजगी उद्योजकांना कौशल्य विकास सुविधा उभारणे, कौशल्य वाढ कार्यक्रम राबविणे तसेच संशोधन व विकास सुविधा उभारणे याकरिता भांडवली सहाय्य देण्याची तरतूदही ह्या धोरणात करण्यात आली आहे.

(४) प्रस्तुतच्या धोरणातील प्रोत्साहनांचा लाभ घेण्यासाठी सविस्तर कार्यपध्दती विषद करणारी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची बाब कार्यवाही खाली आहे.

(५) प्रश्न उध्दवत नाही.

---

### तहसिलदार नाशिक यांनी शेतकऱ्यांचे प्रस्ताव जाणीवपुर्वक प्रलंबित ठेवल्याबाबत

**(४२) ११४९९ (२०-०७-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक तहसिलदार यांच्या कार्यक्षेत्रातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या कामाबाबतच्या तक्रारी, विविध शासकीय योजना, तालुका स्तरावरील महसूल विभागातील शासनाकडे पाठवावयाचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे व इतर विषयाबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे स्थानिक लोकप्रतीनिधिनीं लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.तक्रार२०२५/प्र.क्र.८/ई-३ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये तपासून कार्यवाही करण्याबाबत सूचविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक ०४.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. श्रीम. शोभा पुजारी, तहसिलदार नाशिक यांच्याविरूध्दच्या प्राप्त तक्रारीत विशिष्ट तपासता येण्यासारख्या तक्रारी (specific verifiable complaints) नमुद नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाचा अहवाल पाहता सदरहू तक्रार नस्तीबंद करणे योग्य राहील या अभिप्रायासह विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी अहवाल सादर केलेला आहे. सबब, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अहवालानुसार श्रीम. शोभा पुजारी, तहसिलदार नाशिक यांच्याविरूध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने एकही दोष सिध्द होत नसल्याने सदर प्रकरण निकाली काढण्यासाठी प्रस्ताव शासन मान्यतेस्तव व आदेशार्थ सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील महसूल संकलन आणि वाटप स्थानिक विकास प्रकल्प, सार्वजनिक सेवा व पायाभूत सुविधा सुधारण्याबाबत

**(४३) ११६६५ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यात महसूल संकलन आणि वाटप हा स्थानिक विकास प्रकल्प, सार्वजनिक सेवा आणि पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी प्रभावीपणे काम झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील महसूल विभाग स्थानिक लोकांच्या फायद्यासाठी शासन सुविधा आणि योजनांची उपलब्धता आणि सुलभता गतिमान करेल काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हा व सर्व तालुका स्तरावरील विविध शासकीय समित्या अद्याप स्थापन झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** मुद्दा क्र. (१), (२) व (३) खेड तालुक्यातील मुख्य प्रशासकीय इमारत मंजुरी शासन स्तरावरुन मिळालेली आहे त्यानुसार दिनांक ०४/०७/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

तहसिल कार्यालयामार्फत महसूल लोक अदालत महाराजस्व अभियान, फेरफार अदालत, जिवंत ७/१२ मोहीम यासारख्या योजना राबविण्यात येत आहेत. जिल्हा व तालुका स्तरावरील समित्या गठित आहेत.
मुद्दा क्र. (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगरविकास विभागांतर्गत, संचालक, नगररचना , पुणे यांनी कोटयवधी रुपये अखर्चित ठेवल्याबाबत.**

**(४४) ११७८६ (०८-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून नगरविकास विभागांतर्गत, संचालक, पुणे यांना विशेष सहाय्य योजने अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षाचा सुमारे ७०० कोटी रुपयांचा निधी मिळाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक, नगररचना यांनी माहे मार्च, २०२३ पर्यंत निधीप्राप्त होईपर्यत राहिला खर्च करण्याबाबत कोणतेही नियोजन न केल्याने तसेच प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्यामुळे उक्त निधी अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संचालक नगररचना, पुणे यांच्याकडून गत वर्षाचा निधी माहे मार्च, २०२४ पर्यंत अखर्चित राहिल्याने दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी घाईघाईने निधीचे योग्यरित्या नियोजन न करता सर्व कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासाठी जबाबदार असणा-या संचालक, नगररचना, पुणे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१०-२०२५) :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजना, २०२२-२३ अंतर्गत केंद्र शासनाकडून दिनांक २४.३.२०२४ रोजी मंजूर करण्यात आलेला निधी शासनाने आहरित करुन रु. ७०९.२२ कोटी निधी दिनांक ३१.३.२०२३ रोजी संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, पुणे यांना व सिडको महामंडळास रु.८०.०८ कोटी दिनांक ३१.३.२०२३ रोजी PFMS व्दारे वितरित केला आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा कालावधी (५ दिवस) लक्षात घेता, सदर निधीतून राबवावयाच्या योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे, त्यासंदर्भातील निविदा मागविणे, निविदा अंतिम करणे व प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे केवळ अशक्य होते. सदर निधी खर्च न झाल्याने रु. ७०९.२२ कोटी निधी संचालक, नगर रचना, पुणे यांचेकडे अखर्चित राहीला. सदर निधी अखर्चित राहिल्याबाबत संचालक, नगर रचना, पुणे यांना जबाबदार धरता येणार नाही. मात्र, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये वरील सर्व प्रकल्पांचा समावेश करुन राज्य शासनास प्राप्त झालेला १००% निधी खर्च करण्यात आले आहे. दिनांक १५.३.२०२४ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेले प्रकल्प हे त्या आर्थिक वर्षात घेण्याचे प्रस्तावित नव्हते. सदर प्रकल्प सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील निधीतून घेण्याचे प्रस्तावित होते, त्यानुसार ज्या प्रकल्पांची निविदा अंतीम होऊन कामे सुरु झाली त्यांना सन २०२४-२५ मध्ये निधी देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा, (जि.सोलापूर) येथील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयात विविध संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(४५) १२९३४ (२१-०७-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा, (जि.सोलापूर) येथील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयात विविध संवर्गातील मंजूर असलेल्या ३२

पदांपैकी १४ पदे मागील अनेक दिवसांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे नागरीकांची मोठी गैरसोय होत असून कार्यरत कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त भार पडल्यामुळे त्यांनाही मानसीक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे, २०२५ रोजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने तसेच भू सर्वेक्षणासाठी लागणारे रोअर मशिन व संगणक उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०२५) :** (१) हे, अंशतः खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख,करमाळा या कार्यालयातील एकूण २० मंजूर पदांपैकी १३ पदे कार्यरत असून ७ पदे रिक्त आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधिंनी करमाळा मतदार संघातील उपधिक्षक भूमि अभिलेख, करमाळा कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत तसेच भू सर्वेक्षणासाठी लागणारे रोअर व संगणक मिळणेवावत दिनांक ५.०३.२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे मा. मंत्री (महसूल) महोदयांकडे विनंती केली आहे.

(४) पुणे विभागातील गट क पदसमूह ४ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे कार्यालया मार्फत तसेच जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडून उप अधीक्षक भूमि अभिलेख, करमाळा या कार्यालयासाठी सर्वेक्षणा करीता ई.टी.एस.मशीन-२, रोवर मशीन-२ व लॅपटॉप-६ पुरविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुर्डूवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील महसूल विभागांतर्गत असलेली गोडाऊनची जागा फळे, भाजीपाला, मासे व मटण विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) १२९३६ (२१-०७-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्डूवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील महसूल विभागांतर्गत असलेली गोडाऊनची जागा फळे, भाजीपाला, मासे विक्री व मटण विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २९ मे, २०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) उक्त विषयाबाबत तहसिलदार माढा यांनी सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. सोलापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बांधण्यात आलेली शासकीय धान्य गोदामे हि प्रामुख्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येणाऱ्या धान्याची साठवणूक करणेकामी बांधण्यात आलेली आहेत. कोणताही सार्वजनिक उपक्रम किंवा इतर कोणताही व्यवसाय करणेकामी शासकीय धान्य गोदामातील जागा भाडे करार तत्वावर अथवा अन्य

मार्गाने वापरणेस व देणेस मा अन्न, नागरी व पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांनी मान्यता दिलेली नाही. वर नमूद उपक्रम करणेसाठी जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ व राष्ट्रीय अन्नसुरखा अधिनियम २०१३ मध्ये अशी कोणतीही तरतूद केलेली नाही. तसेच उक्त विषयाबाबत वर नमूद केल्यानूसार आझाद मैदानालगत महाराष्ट्र शासनाचे महसूल विभागाच्या मालकीचे नगर भूमापन क्रमांक ३६०२ मध्ये ३०२५.७० चौ मीटर एवढया क्षेत्रामध्ये धान्याचे दोन मोठे गोडाऊनची जागा फळे भाजीपाला, मासे विक्री, मटन मार्केटसाठी उपलब्ध करुन देणेकरीता जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार सदर जागा देता येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे ब्राह्मणी (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) येथील कृषी उत्पादक कंपन्यांवर शासनाचे नियंत्रण असण्याबाबत

**(४७) १३५७० (२६-०६-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ब्राह्मणी (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) येथील ग्रीनअप कृषी उत्पादक या कंपनीने राहुरी व नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांचा माहे एप्रिल, २०२५ मध्ये शेतमाल खरेदी करुनही त्या शेतमालाचे पैसे शेतकऱ्यांना अदा केले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीने शेतकऱ्यांची सुमारे ६५ लाख रुपयांची फसवणूक केली व संचालकांपैकी एका संचालकाने आत्महत्या केली असून राहुरी पोलीस ठाणे येथे एकूण सात आरोपींवर फसवणूकीचा गुन्हा माहे जून, २०२५ मध्ये दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विविध कृषी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतमाल घेऊन त्यांचे पैसे वेळेवर अदा करण्याबाबत तसेच कृषी उत्पादक कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०७-२०२५) :** (१) होय
(२) होय
(३) ग्रीनअप कृषी उत्पादक कं.लि., राहुरी, जि.अहिल्यानगर ही संस्था कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत आहे. संस्थेवर रजिस्टार ऑफ कंपनी यांचे मार्फत वाणिज्य व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांचे नियंत्रण आहे. परंतु, ग्रीनअप कृषी उत्पादक संस्था, ता.राहुरी ही संस्था थेट पणन परवाना धारक असल्याने प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील तरतूदीनुसार परवाना निलंबीत करुन रद्द करणेबाबत कार्यवाही का करण्यात येऊ नये अशी नोटिस देण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी दिनांक २२.०७.२०२५ रोजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोनांझा इंडस्ट्रीयल इस्टेट, कांदिवली (पश्चिम) मुंबई या औद्योगिक वसाहतीस भीषण आग लागल्याबाबत

**(४८) १३६१२ (०२-०७-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोनांझा इंडस्ट्रीयल इस्टेट, कांदिवली (पश्चिम) मुंबई या औद्योगिक वसाहतीस दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान भीषण आग लागली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगीमध्ये वित्त व जीवित हानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुर्घटनाग्रस्तांना आर्थिक मदत देणेबाबत तसेच भविष्यात अशा आगीच्या घटना रोखण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बोनांझा इंडस्ट्रीयल इस्टेट, कांदिवली (पश्चिम) मुंबई या औद्योगिक वसाहतीस दिनांक १० मे, २०२५ रोजी आग लागली होती.

(२) सदर आगीमध्ये अंदाजे रु.६५ लाख रुपये इतकी वित्त हानी झाली असून कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही.

(३) बोनांझा इंडस्ट्रीयल इस्टेट, कांदिवली (पश्चिम) मुंबई या औद्योगिक वसाहतीस लागलेल्या आगीचे कारण सदोष विद्युत प्रणाली असे आढळून आले. दिनांक २७.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरची घटना ही नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने आर्थिक मदत देय होत नाही.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण अधिनियम २००६ नुसार अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना मालक / भोगवटादार यांची आहे. तसेच, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नसल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण अधिनियम २००६ नुसार सदर आस्थापनांवर कलम ८ (१) नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-कल्याण मार्गावरुन जलवाहतूक सेवा विकसित करण्यासाठी भाईंदरमध्ये जेट्टी उभारण्याबाबत

**(४९) १३७४६ (१९-०८-२०२५). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-कल्याण मार्गावरुन जलवाहतूक सेवा विकसित करण्यासाठी भाईंदरमध्ये जेट्टी उभारण्याचे काम हाती घेण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जेट्टी आता स्थलांतरित करण्याची मागणी होत असून त्यानुसार कार्यवाही केल्यास जेट्टी विकसित करण्यास विलंब होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी जेट्टी विकसित करताना स्थानिक प्रशासनाला विश्वासात घेणे अपेक्षित होते, परंतु तसे करण्यात न आल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जेट्टी स्थलांतरीत करण्याबाबत वा स्थानिक प्रशासनाला विश्वासात घेऊन त्याच ठिकाणी जेट्टी उभाण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (३०-०९-२०२५) :** (१), (२) व (३) होय.

(४) मीरा भाईंदर महानगरपालिकेकडून सदर जेट्टीचे काम कोळीनगर येथे करणेबाबतची व्यवहार्यता तपासणेबाबत कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे कोळीनगर येथे सुचविलेली जागा ही अरुंद आहे त्या जागेवरुन कामाकरिता आवश्यक साहित्याची ने आण करताना अडचण होणार आहे. सदर जागेत कांदळवन असल्याने सदरचे कांदळवनास हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जेट्टीलगत आवश्यक सुविधा निर्माण करण्याकरिता सदरची जागा ही अडचणीची आहे. सदर जागेवर काम करण्याकरिता हाती घेतलेले काम रद्द करुन नवीन ठिकाणासाठी केंद्र शासनामार्फत नव्याने मंजूरी घ्यावी लागेल तसेच पर्यावरण विषयक परवानग्या घेण्याकरिता अंदाजे ३ ते ४ वर्षाचा कालावधी लागू शकतो त्यामुळे उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता नवीन प्रस्तावित जागेवर रो रो जेट्टी व तत्सम सुविधांचे काम करणे शक्य होणार नाही

असे मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवेगावबांध (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) येथील गावांमध्ये पाळीव जनावरांना लंम्पी या त्वचा रोगाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात झाल्याबाबत

**(५०) १३९७४ (०९-१०-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगावबांध (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) येथील गावांमध्ये पाळीव जनावरांना लंम्पी या त्वचा रोगाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येत असताना मागील काही दिवसांपासून अनेक गावांतील गायी, म्हशी या आजाराने त्रस्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावे बाकटी या गावाअंतर्गत असलेल्या पशुवैद्यकीय उपचार केंद्रा अंतर्गत येत असून तेथे पशुवैद्यकीय अधिकारी नसणे तसेच या आजारावर अद्याप उपचार सुध्दा होत नसून लसीकरणही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय पशुवैद्यकीय दवाखाने असतांना पशुसंवर्धन अधिकाऱ्यांअभावी शेतकऱ्यांना खाजगी पशुवैद्यकीय दवाखान्यात जावे लागत असून पाच ते पंधरा हजार रुपये द्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लंम्पी आजार नियंत्रणात आणून बाधीत जनावरांवर वैद्यकीय उपचार तातडीने सुरु करण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लंम्पी आजारावर उपचार व पशुवैद्यकीय अधिकारी याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०२५) :**
(१) नाही.

नवेगाव बांध (ता. अर्जुनी मोरगाव, जि. गोदिया) येथे पाळीव पशुधनास लंम्पी या चर्म रोगाचा प्रादुर्भाव झाला नाही. तथापि पशुवैद्यकीय चिकित्सालय, बाकटी या संस्थेच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत १६ लहान वासरांमध्ये लंम्पी चर्मरोग सदृश लक्षणे आढळून आले आहे.
(२) अशंत: खरे आहे.

पशुवैद्यकीय चिकित्सालय, बाकटी येथील पशुधन विकास अधिकारी हे पद रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार नवेगाव बांध (ता. अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया) येथे कार्यरत असलेल्या पशुधन विकास अधिकारी यांचेकडे देण्यात आला आहे.

पशुवैद्यकीय चिकित्सालय, बाकटी अंतर्गत येणाऱ्या एकुण ११ गावांमधील सर्व गोवंशीय पशुधनाचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

परिसरात ६ महिन्याखालील लहान वासरांमध्ये लंम्पी सदृश्य लक्षणे आढळून आली असुन औषधोपचार झाल्यानंतर सर्व आजारी वासरे बरी झालेली आहेत.
(३), (४) व (५) लंम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच शासकीय पशुवैद्यकीय चिकित्सालयामार्फत सर्व लंम्पी बाधित १६ वासरांना औषधोपचार केलेले असून ती सर्व वासरे पुर्णपणे बरी झालेली आहेत.

लंम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच तातडीने औषधोपचार, लसीकरण, गोचिड गोमाश्या निर्मुलन, पशुपालकांमध्ये जनजागृती, आदी उपक्रम राबवून साथरोग नियंत्रणात आले असून दिनांक ३०.५.२०२५ नंतर लंम्पी चर्म रोग बाधित पशुधन आढळून आलेले नाही व कोणत्याही पशुधनाचा या आजाराने मृत्यू झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.